वसई विरार शहर महानगरपालिका

डॉ. कैलास शिंदे
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

सुधारित अर्थसंकल्प सन २०१९-२० सह सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत मा. आयुक्त यांची टिपणी

मा. स्थायी समिती सभापती व सन्माननिय सभागृह,

वसई विरार शहर महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९५ अन्वये मी सन २०१९-२० या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे सुधारित अर्थसंकल्प व सन २०२०-२१ या वर्षाचे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. याच अधिनियमाचे कलम ९६ नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर विचार विमर्ष करुन अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर करणेस मा. स्थायी समितीच्या शिफारशीसाठी सविनय सादर.

अर्थसंकल्पीय गोषवारा

वर्ष	प्रारंभिक शिल्लक	जमा रकमा	प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा	खर्च रकमा	अखेर शिल्लक
सन २०१६-१७ प्रत्यक्ष रकमा	रु. ३६७ कोटी ५० लक्ष	रु. ७४१ कोटी ७५ लक्ष	रु. ११०९ कोटी २५ लक्ष	रु. ७३२ कोटी ६४ लक्ष	रु. ३७६ कोटी ६१ लक्ष
सन २०१७-१८ प्रत्यक्ष रकमा	रु. ३७६ कोटी ६१ लक्ष	रु. ७८५ कोटी ४५ लक्ष	रु. ११६२ कोटी ०६ लक्ष	रु. ७२० कोटी ७७ लक्ष	रु. ४४१ कोटी २९ लक्ष
सन २०१८-१९ प्रत्यक्ष रकमा	रु. ४४१ कोटी २९ लक्ष	रु. ९६१ कोटी ५९ लक्ष	रु. १४०२ कोटी ८८ लक्ष	रु. ८०३ कोटी ७८ लक्ष	रु. ५९९ कोटी १० लक्ष
सुधारीत अंदाज सन २०१९-२०	रु. ५९९ कोटी १० लक्ष	रु. १३०९ कोटी ८२ लक्ष	रु. १९०८ कोटी ९२ लक्ष	रु. १३५१ कोटी ५७ लक्ष	रु. ५५७ कोटी ३४ लक्ष
मुळ अंदाज सन २०२०-२१	रु. ५५७ कोटी ३४ लक्ष	रु. १४६६ कोटी ६२ लक्ष	रु. २०२३ कोटी ९७ लक्ष	रु. १९३७ कोटी ४८ लक्ष	रु.८६ कोटी ४९ लक्ष

वसई विरार शहर महानगरपालिका हे झपाटयाने वाढ होणारे नागरी क्षेत्र म्हणून गेल्या काही वर्षात उदयास आले आहे. झपाटयाने वाढणारे नागरीक्षेत्र आणि लोकसंख्या या घटकाचा परिणाम शहराच्या नागरी सुविधा पुरविण्यांवर होत आहे. महानगरपलिका सदर सुविधा देण्याचा दृष्टीने गेल्या काही वर्षापासुन अर्थसंकल्पीय नियोजन व प्रशासनातील गतीमानतेबरोबर नियोजनबध्द विकासाचा प्रयत्न करीत आहे. वसई विरार शहराच्या वाढणाऱ्या नागरी समस्यांचा विचार करता त्या सोडवण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करतांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे मोठे आव्हान असून महसूली उत्पन्न वाढीवर भर देऊन व योग्य त्या ठिकाणी महसुली खर्चात कपात करुन ते पुर्ण करावे लागणार आहे आणि यासाठी शहरातील सर्व घटकांचे सक्रिय सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुनियोजित विकासाबाबत मी बांधिल आहे. अर्थसंकल्पामधील समाविष्ठ असलेल्या ठळक बाबीचा उल्लेख पुढील प्रमाणे.

महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्न स्त्रोत

१ **मालमत्ता कर उत्पन्न** **:-** महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मालमत्तांना कर आकारणी झालेली नाही अशा मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण करुन करमुल्यनिर्धारण करण्यांत येणार आहे. सद्यस्थितीत **मालमत्ताधारकांना कर भरणा करण्यासाठी सोयीचे व्हावे या करीता खालील ऑनलाईन सेवा उपलब्ध करुन देण्यांत आल्या आहे.**

१) पेटीयम २) डेबिट/क्रेडिट कार्ड, ३) नेट बँकिंग, ४) युपीआय ५) गुगल पे द्वारे करांचा भरणा स्विकारला जातो.

मालमत्ता कर , मोबाईलटॉवर वरील कर, उपभोक्ता कर, नोटीस फी, व्याज, शिक्षण कर रिबेट व रोजगार हमी कर रिबेट इत्यादी पासुन सन २०१९-२० मध्ये अपेक्षित उत्पन्न हे रु. ३११ कोटी ६८ लक्ष तसेच सन २०२०-२१ मध्ये रु ३४२ कोटी ८४ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

२	**स्थानिक संस्थाकर / वस्तु व सेवा कर उत्पन्न**	:-	स्थानिक संस्था कराबाबत कर दात्यांनी दाखल केलेली विवरणपत्र पडताळणी करुन थकीत उत्पन्न प्राप्त करुन घेणेची कार्यवाही सुरु असुन याद्वारे सन २०१९-२० मध्ये ६ कोटी ५० लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. * सद्यस्थितीत सदर कराऐवजी शासनामार्फत वसुल केल्या जात असलेल्या वस्तु आणि सेवा कराचे महसुलातून महानगरपालिकेस अनुदान दिले जात असुन याद्वारे सन २०१९-२० मध्ये ३३० कोटी व सन २०२०-२१ मध्ये रु. ३६२ कोटी ८६ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.
३	**विशेष अधिनियमांखालील वसुली**	:-	नगररचना विभागामार्फत नियमीत प्रकरणांचे छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम, टि.डी.आर. प्रिमियम, पुन:वैधिकरण याबाबींपासून सन २०१९-२० मध्ये रु. १२६ कोटी ७० लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ११६ कोटी ५५ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील २१ गावांसाठी देखील वसई विरार शहर महागनरपालिकेस नियोजन व विकास प्राधिकरणाचे अधिकार प्राप्त झाले आहे त्यामुळे सन २०१९-२० मध्ये रु. २ कोटी ५२ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. तसेच सन २०२०-२१ मध्ये रु. ३ कोटी ९३ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.
४	**अग्निशमन सेवा उत्पन्न**	:-	अग्निशमन सुरक्षा व विशेष अग्निसंरक्षण फी (कॅपीटेशन फी), बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून वसुल केली जात असुन विशेष अग्निशमन उपकर सामान्य करासोबत वसुल केला जात आहे. प्रत्यक्ष अग्निशमन सेवा महानगरपालिका क्षेत्रात मोफत असुन महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेर अग्निशमन सेवा पुरविण्यासाठी अग्निशमन फी आकारली जात आहे. अग्निशमन सेवेपासून सन २०१९-२० मध्ये रु. १५ कोटी ९६ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. १७ कोटी १६ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

५	**वैद्यकिय सेवा उत्पन्न**	**:-**	**महानगरपलिकेकडून २०२०-२१ मध्ये नागरिकांसाठी वैद्यकिय सेवा पुर्ण पणे मोफत करण्यात आली आहे.** त्यामुळे या पुढे वैद्यकिय सेवे पासूनचे उत्पन्न हे फक्त महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या दवाखाने व रुग्णालयांना नाहरकत दाखला/ नुतणीकरण दाखला देण्यात येतो त्यापासुनचे उत्पन्न सन २०१९-२०-२१ मध्ये रु. १ कोटी २ लक्ष आहे.
६	**स्वच्छता कर उत्पन्न**	**:-**	मालमत्तेवरील सामान्य करासह आकारणी करुन वसुल केल्या जाणाऱ्या विशेष स्वच्छता करापासून सन २०१९-२० मध्ये रु. २१ कोटी ९० लक्ष व सन २०२०-२१ मध्ये २४ कोटी ०९ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.
७	**पाणीपुरवठा सेवा उत्पन्न**	**:-**	विशेष पाणी पट्टी द्वारे सन २०१९-२० मध्ये रु. ६४ कोटी ४३ लक्ष ३३ हजार व सन २०२०-२१ मध्ये ७५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. बांधकाम परवानगी देताना विकासकाकडून वसुल केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्कापासून सन २०१९-२० मध्ये रु. ६५ कोटी १२ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये ८५ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. वाढीव पाणी उपलब्ध झाल्याने नविन नळ जोडण्या मंजूर करण्यात येत आहे. **सद्यस्थितीत मनपाद्वारे होणारा पाणी पुरवठा ठोक स्वरुपात होत असल्याने पाणी पट्टी आकारणी देखील ठोक स्वरुपात वसुल केली जाते. प्रत्यक्ष वापरानुसार मागणी देयके बजावल्यास पाणी पट्टी उत्पन्नात भरीव वाढ अपेक्षित आहे. यासाठी महानगरपालिकेकडून देण्यांत आलेल्या ४६ हजार नळ जोडण्यांना टप्प्या टप्प्याने जलमापके बसविणे हाती घेण्यांत येणार आहे.**
८	**शासकिय अनुदाने उत्पन्न**	**:-**	अमृत योजनेअंतर्गत योजनेसाठी अनुदान, वस्तु व सेवा कर अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान रस्ते दुरुस्तीसाठी अनुदान स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मा. खासदार व मा. आमदार निधी अनुदान, एकात्मीक तलाव संवर्धन अनुदान, वाचनालय अनुदान,

मत्स्य विकास महामंडळाकडील मार्केट बांधकामासाठी अनुदान, दलित वस्ती सुधारणा अनुदान अशा विविध स्वरुपाच्या अनुदानापोटी सन २०१९-२० मध्ये रु. ४४३ कोटी ६१ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ५१३ कोटी १८ लक्ष इतके अनुदान अपेक्षित आहे.

९ **इतर उत्पन्न** :- **महानगरपालिकेच्या इतर उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेचे उपविधी असणे गरजेचे आहे. सदर उपविधीचे काम अंतिम टप्प्यात असून उपविधी मंजूरीनंतर महानगरपालिकेची फी व इतर उत्पन्नत वाढ होणार आहे.** इतर उत्पनामध्ये समाविष्ट प्रयोग खेळावरील कर, पे & पार्क वाहनतळ व्यवस्था, नो पार्किंग मधील वाहने उचलणे, अतिक्रमण हटविणे व अनधिकृत बांधकाम तोडणे व प्रशासकिय शुल्क, जुन्या भंगाराच्या विक्रीचे उत्पन्न, निविदा इतर नगरपालिका प्रकाशनांचे उत्पन्न, रुग्णालय व इतर आस्थापनांच्या नोंदणीसाठी नाहरकत दाखला व दाखला नुतणीकरण फी, जन्म - मृत्य दाखला, विवाह नोदंणी फी इत्यादी बाबींपासून सन २०१९-२० मध्ये रु. ४३ कोटी ३९ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ४५ कोटी ४२ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

१० **वाचनालय सेवा उत्पन्न** :- वाचनालय सेवेपासून सन २०१९-२० मध्ये रु. ८ लक्ष ५ हजार व २०२०-२१ मध्ये ८ लक्ष ५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

११ **तलाव व्यवस्था उत्पन्न** :- तलाव व्यवस्थेपासून फी चे उत्पन्न सन २०१९-२० मध्ये रु. ८५ लक्ष व सन २०२०-२१ रु. ८५ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

❖ ठळक खर्च बाबी ❖

१ **आस्थापना खर्च** :- महानगरपालिकेच्या विस्तीर्ण कार्यकक्षेचा विचार करता आवश्यक सुविधा पुरवणेसाठी झोन निहाय साफसफाई ठेक्यासह प्रशासकीय, तांत्रिक, नियोजन, विकास, अग्निशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य, दिवाबत्ती, वाचनालय, शिक्षण, कर वसुली इ. जवळपास सर्व कामांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे अभिकर्ता नेमून सेवा पुरवणेची तरतुद आहे. सद्यस्थितीत ठेका कर्मचाऱ्यांसाठी करावा लागणारा कर भारासह इतर खर्च विचारात घेता नविन पदे भरणे फायद्याचे असल्याने महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील आकृतीबंधानुसार रिक्त असलेली पदे आवश्यकतेनुसार भरली जाणार आहेत. **स्थायी, अस्थायी व ठेका कर्मचारीसह आस्थापना खर्च हा सन २०१९-२० मध्ये १३० कोटी १८ लक्ष अपेक्षित आहे. तर सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात १४८ कोटी ७२ लक्ष खर्च अपेक्षित आहे.**

२ **नगर रचना** :- सन २०१९-२० या वित्तीय वर्षात केंद्र शासनाच्या ऑनलाईन इमारती बांधकाम परवाना योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झालेली आहे. सबब याकामी ऑटो डी.सी.आर प्रोग्राम तयार करणे व त्या संबंधित कामे एजन्सी मार्फत करावयाची प्रक्रिया लवकरच करण्यांत येणार आहे. जी. आय. एस. मॅपींग / लॅण्ड युज अपडेशन, ऑटो डी. सी. आर, सि. आर. झेड. सर्व्हे, आकस्मिक खर्च इत्यादी बाबींसाठी

सन २०१९-२० मध्ये रु. २ कोटी ७० लक्ष व सन २०२०-२१ मधे रु. ८ कोटी ३५ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

३	**पथदिप व विद्युत व्यवस्था**	:-	शहरातील पथदिप व्यवस्थापन, अपारंपारीक ऊर्जास्त्रोत निर्मिती, विद्युत देयक, विद्युत मंडळाचे चार्जेस, पोल स्थलांतर, नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था, इत्यादी खर्चासाठी सन २०१९-२० मध्ये रु. ३७ कोटी ८५ लक्ष व सन २०२०-२१ मधे रु. ५९ कोटी ३९ लक्ष इतकी तरतूद आहे. सद्याचे दिवे आवश्यकतेनुसार दुरुस्ती देखभालीच्या वेळी अथवा टप्याटप्याने बदलून एल ई डी व्यवस्था अंमलात आणण्याचा प्रस्ताव असून यामुळे भविष्यातील महसुली खर्चात २८ ते ३०% खर्च कपात अपेक्षित आहे.
४	**अग्निशमन व्यवस्था**	:-	महानगरपालिकेकडे अतिअद्यावत मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे येथे १ आहे. अद्यावत उप अग्निशमन केंद्र २ श्रीप्रस्थ नालासोपारा व सनसिटी दिवाणमान. साधारण अग्निशमन केंद्र ३ पारनाका वसई, विराट नगर विरार पश्चिम व फुलपाडा विरार पुर्व येथे आहे. त्याद्वारे मनपा क्षेत्र तसेच लगतचे क्षेत्रामध्ये अग्निशमन व बचावकार्य करण्यांत येते. **१)अग्निशमन केंद्र म्हाडासंकूल २)अग्निशमन केंद्र नवघर औद्योगिक वसाहत नवघर पुर्व याची कामे पुर्ण झाली असून सदर केंद्र लोकार्पण लवकरात लवकर होणार आहे.** **१)अग्निशमन केंद्र वालिव,२) अग्निशमन केंद्र पेल्हार ३) अग्निमशन केंद्र वसई पारनाका येथे प्रस्तावित आहे. व त्यानुषंगाने अग्निशमन विभागासाठी मुख्य अग्निशमन नियंत्रण कक्ष अत्याधुनिक व संपर्क यंत्रणा आचोळे येथे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १० कोटींची तरतुद केलेली आहे.** **लवकरच अग्निशमन ताफ्यात हॅजमॅट व्हॅन व ६७ मी. उंच (टी.टी.एल.) अत्याधुनिक अग्निशमन वाहन दाखल होणार आहे.** सन २०१९-२० मध्ये रु. १२ कोटी ३८ लक्ष व सन २०२०-२१ मधे रु. ५९ कोटी २२ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

५	**शहर स्वच्छता / घनकचरा व्यवस्थापन** :-	वसई विरार शहर महानगरपालिका शहर स्वच्छता विभागामार्फत विविध योजना प्रभावी पणे राबविल्या जात असून यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजना, स्वच्छता विषयक जनजागृती, नाले सफाई, डंपिंग ग्राऊंड व्यवस्था, सॅनीटरी लॅडफील व्दारे कचऱ्याची विल्हेवाट लावणे, शुन्य कचरा अभियानांर्तगत जन जागृती केली जात आहे. सद्य: स्थितीची लोकसंख्या अंदाजे १९.०२ लक्ष एवढी आहे. शहराची कचरा निर्मिती प्रति ग्रॅम/ प्रति माणसी ४०० ग्रॅम प्रमाणे दररोज अंदाजे ६०० ते ६५० मे.टन इतका कचरा निर्माण होत असतो. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दितील निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करण्याच्या दृष्टीने ओला कचऱ्यासाठी हिरव्या रंगाच्या व सुक्या कचऱ्यासाठी निळ्या रंगाच्या कचरा कुंडया शहरात बसविण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत **ऑगष्ट २०१९ मध्ये डंपींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायोमिथेनेशन आणि बायोमायनिंग करिता रु. १४७.५४ कोटी च्या विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाकरीता सन २०१९-२० रु. १८० कोटी ६३ लक्ष व सन २०२०-२१ रु. १८७ कोटी ७८ लक्ष तरतुद आहे.**
६	**भुयारी गटार योजना** :-	**१)केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटी कार्यक्रमांतर्गत रु. ६६.२२ कोटी रकमेच्या वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विरार शहर भुयारी गटार प्रकल्पास (STP-२) दि. १८/८/२०११ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. सदर योजनेतील काम पुर्ण झाले असून, मलनि:स्सारण प्रकल्प (क्षमता ३० MLD) ऑगष्ट २०१७ मध्ये कार्यान्वीत करण्यात आला आहे. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए , बी व सी अंतर्गत मुख्य मल:निसारण वाहिनीला इमारतीच्या मलनि:सारण वाहिनीची जोडणी करणेचे काम प्रगतीपथावर चालू आहे.** **२)महाराष्ट्र शासनाने अमृत कार्यक्रमांतर्गत सन २०१७/१८ साठीच्या वार्षिक कृति आराखडयात वसई विरार मलनि:सारण योजनेकरीता रु.१७० कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिली असुन अद्यापही निधी प्राप्त झालेला नाही. या रकमेच्या अधीन राहुन पुर्ण प्रस्तावात समाविष्ठ**

असलेल्या ७ झोन पैकी नालासोपारा झोन क्र.३ चे मलनि:सारण योजनेचे काम अमृत योजना २०१७/१८ अंतर्गत हाती घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदरच्या मलनि:सारण योजनेचे प्रकल्प अहवाल, संकल्पन आराखडे, नकाशे अंदाजपत्रके बनविण्याचे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरणा मार्फत सुरु आहे.

७ **रुग्णालयीन सेवा (वैद्यकिय आरोग्य)** :- महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सध्या सर डी. एम. पेटीट रुग्णालय, वसई, तुळींज रुग्णालय, माता बालसंगोपन केंद्र, सातिवली याशिवाय एकवीस नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आठ दवाखाने यामार्फत रुग्णालय सेवा उपलब्ध केल्या आहेत.

तसेच खालील प्रमाणे नविन रुग्णालय/आरोग्य केंद्र बांधकाम प्रस्तावित आहेत.

१)प्र.स. डी. आचोळे येथे सर्वे नं. ६ मध्ये रुग्णालय बांधकाम

२)प्र.स.एच. कौलसिटी येथे रुग्णालय बांधकाम

३)प्र.स.जी. वॉर्ड क्र. १०५ जुचंद्र येथे परिसरात ७० बेडचे हॉस्पीटलचे बांधकाम.

४)प्र.स.ए विरार प. प्र.क्र.३२ बोळींज येथे नागरी आरोग्य केद्रांचे बांधकाम

५)प्र.स.आय कार्यक्षेत्रातील सर डी. एम. पेटीट रुग्णालयाच्या इमारतीचे नुतनीकरण

महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी अधिक भर देण्यात आला असून तद्नुसार वाढीव तरतुदी प्रस्तावित केल्या आहेत.

एकूण रुग्णालय व्यवस्थापनासाठी सन २०१९-२० मध्ये रु. २४ कोटी ३ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ६० कोटी १८ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

८	**आपत्ती व्यवस्थापन**	**:-**	आपत्कालीन परिस्थितीत गरीब गरजूंना अर्थसहाय्य करणे तसेच आपत्कालीन कालावधीत विशेष सेवा पुरविणेसाठी उपाय योजना करणे, आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणेसाठी ट्रांझीट कॅम्प, आपत्कालीन परिस्थिती नियंत्रणासाठी पोलिस मदतीसह हेलिकॅप्टर भाडे, कृती आराखडा तयार करुन तद्नुसार आवश्यक ती व्यवस्था करणेसाठी **अद्यावत आपतकालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्ष अत्याधुनिक बिनतारी संदेश यंत्रणा तसेच जीवरक्षक बोट, पाण्याचा निचरा करणेकामी उंच क्षमतेचे पंप घेण्याचे प्रस्तावित आहे.** यासाठी सन २०१९-२० मध्ये रु. ५ कोटी २८ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. कोटी ३ कोटी ५ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी : सन २०१९-२०-२१ मध्ये प्रतिवर्षी २५ लक्ष इतकी तरतुद आहे. महापौर सहाय्यता निधी : महानगरपालिका निधीतून गरीब गरजूंना आर्थिक मदत करताना विशेष बंधनाशिवाय आर्थिक सहाय्य देता यावे हा या निधीचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी सन २०२०-२१ मध्ये प्रतिवर्षी प्रमाणे रु. ५० लक्ष इतकी महानगरपालिका अनुदानाची तरतूद प्रस्तावित आहे.
९	**सर्व धर्मियांसाठी दहन व दफनभुमी व्यवस्था**	**:-**	महानगरपालिका क्षेत्रातील दहन भुमींमध्ये महानगरपालिका लगतचे क्षेत्रातील व्यक्तींचेदेखील अंत्यसंस्कार केले जात असुन अशा सर्व अंत्यसंस्कारासाठी देखील प्रेत दहनाकरीता लाकडे मोफत उपलब्ध केली जातात. **दहन भूमीचा इतर नागरिकांना होणारा त्रास विचारात घेऊन एकात्मीक दहन भूमी विकास कार्यक्रमांतर्गत सुशोभिकरण करुन सदर ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे, पुरेशा उंच संरक्षक भिंतीची व्यवस्था करणे, सर्व धर्मीयांसाठी भुसंपादनासह दफनभूमी विकसित करणे तसेच उपलब्ध दफन भूमींच्या विकास व सौंदर्यीकरण इत्यांदीसाठी बांधकाम विभागांतर्गत खाली दर्शवलेल्या ठिकाणी दहन दफनभूमीचा विकास केला जाणार आहे.**

१) प्र.स.एच. मध्ये दफनभुमीचा विकास

२) प्र.स. डी. अंतर्गत तुळींज स्मशानभुमीचा विकास

३) प्र.स. जी वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण स्मशानभुमीचा विकास

४) प्र.स.ई नालासोपारा प. प्र.क्र. ५७ समेळ स्मशानभुमीचा विकास

५) प्र.स. एफ धानिव पेल्हार क्षेत्रातील खैरपाडा येथे स्मशानभुमीचा विकास

६) प्र.स.जी. वॉर्ड क्र. ११५ मध्ये बापाणे येथे स्मशानभुमीचा विकास

७) प्र.स.एफ धानिव पेल्हार क्षेत्रातील शिरसाड गावात स्मशानभुमीचे बांधकाम

८) प्र.स. जी वॉर्ड क्र. ९० कोल्ही येथील स्मशानभुमीचा विकास

९) प्र.स.जी वॉर्ड क्र. ९० तारकेनगर येथील स्मशानभुमीचा विकास

१०) प्र.स.आय. कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०७ किरवली स्मशानभुमीचा विकास

११) प्र.स. आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ पापडी स्मशानभुमीचा विकास

१२) प्र.स. आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०८ तांबडीपाडा स्मशानभुमीचा विकास

१३) विरार प. प्र.क्र. १५ आगाशी स्मशानभुमीचा विकास

१४) विरार प. प्र.क्र.१५ पुरापाडा स्मशानभुमीचा विकास

एकूण व्यवस्थेसाठी सन २०१९-२० मध्ये रु. ८ कोटी १७ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. १४ कोटी ७ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

१० उद्यान व्यवस्था :- महानगरपालिका क्षेत्रातील विविध उपलब्ध ठिकाणी अबाल वृध्दांसाठी उद्यान, सर्वसाधारण उद्यान, विज्ञान उद्यान, वनस्पती उद्यान, जॉगर्स पार्क इत्यादी विकसित करणे तसेच उद्यानामध्ये खेळणी, क्रिडा साहित्य, म्युझीकल सिस्टीम, इलेक्ट्रीक फिटींग, बैठक व्यवस्थेसाठी बाकडे, कारंजे व्यवस्था, खत निर्मीती प्रकल्प राबविणे, ही कामे महानगरपालिकेच्या उद्यानात केली जात असून खालील नविन उद्यानांचा विकास

१) विरार पु. नारंगी येथील पिकनीक पार्कचा विकास

२) विरार पु. आरक्षण क्र. १४२ मध्ये बोटनिकल पार्कचे बांधकाम

३) पेल्हार धरणालगत आरक्षण क्र. ८५१ पिकनीक पार्कचा विकास

४) आरक्षण क्र. ८० मध्ये एव्हरशाईन सिटी येथे विद्याविकासिनी शाळेसमोरील उद्यानासाठी आरक्षित जागेत उद्यानाचा विकास.

५) प्र.स. आय कार्यक्षेत्रातील पापडी चणेबोरी उद्यानाचा विकास

६) प्र.स.एच. मध्ये वॉर्ड क्र. ९५ खलाटीपाडा येथे सुर्यास्त उद्यानाचा विकास

७) प्र.स.जी वॉर्ड क्र.९० मध्ये सातिवली तलाव येथील आरक्षित उद्यानाचा विकास

८) प्र.स. जी गोकुळ नगरी उद्यानाचा विकास

९) प्र.स.जी वॉर्ड नं. ७४ स.नं. ६८ उद्यानाचा विकास

१०) नालासोपारा प. आरक्षण क्र. ३८८ स.नं.३६/१ ब येथील आरक्षित उद्यानाचा विकास.

उद्यान व्यवस्थासाठी सन २०१९-२० मध्ये रु. १४ कोटी ९० लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. २४ कोटी १२ लक्ष तरतुद प्रस्तावित आहे.

११	**सांस्कृतिक भवन, समाजमंदिर व नाटयगृह व्यवस्था**	**:-**	**महानगरपालिकाक्षेत्रात खाली दर्शवल्याप्रमाणे नाटयगृह व सभागृहाचे बांधकाम होणार आहे.** **१) प्र.स.डी नालासोपारा पु. येथील मजेठिया नाटयगृहाचे नुतनीकरण.** **२) मौजे मालोंडे येथील आरक्षित जागेत नाटयगृहाचा विकास** **३) प्र.स.ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा प. येथील प्र.क्र. ९४ मध्ये निर्मळ शंकराचार्य मंदिरालगत सभागृहाचे बांधकाम** सांस्कृतिक भवन व समाजमंदिर व्यवस्थेसाठी सन २०१९-२० मध्ये रु. ९ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ३ कोटी ४८ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.
१२	**मार्केट व्यवस्था**	**:-**	शहरात विविध ठिकाणी शितगृहाच्या व्यवस्थेसह ओले मासळी मार्केट मटन मार्केट, सुकी मासळी मार्केट, भाजी मार्केट, फुल मार्केट इत्यादी मार्केट व बहुउद्देशिय मंडईसह, शक्य होईल तितक्या फेरीवाल्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून अन्यत्र स्थलांतरीत करण्याच्या हेतूने **१) प्र.स.जी गोखिवरे येथे बहुउद्देशिय मार्केटचे बांधकाम.** **२) प्र.स.आय. कार्यक्षेत्रात तामतलावाचे येथे मार्केटचे बांधकाम** **३) प्र.स.डी मधील वॉर्ड क्र.९२ नवघर पु. येथे बहुउद्देशिय इमारतीचे बांधकाम** **४) प्र.स.ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा प. येथील प्र.क्र.९४ मधील निर्मळ येथे मार्केट शेड व इमारतीचे बांधकाम** सन २०१९-२० मध्ये रु. १ कोटी १२ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ८ कोटी ०३ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

१३ **तलाव व्यवस्था** :- विरार येथील ॲड. सि. पी. सोलंकी परिक्रमा व नौकाविहार केंद्र तसेच नालासोपारा येथील चक्रेश्वर तलाव, तामतलाव, आचोळा तलाव, नानभाट तलाव, बर्फेश्वर तलाव, राम मंदिर तलाव विकसित करण्यात आलेले असून एकात्मिक तलाव संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून निर्मळ येथील विमल तलाव येथे जॉगींग ट्रॅक, ग्रीन वॉल, ग्रीन हाऊस, धोबी घाट, विसर्जन घाट, सोलार पावर सिस्टीम लेझर शो, विरंगुळा केंद्र, यासह चेन ऑफ लेक नुसार खालील तलाव सुशोभिकरण करण्याचे प्रस्तावित आहे.

१) विरार प. प्र.क्र. ९ मध्ये भोंगाळे येथील तलावाचे सुशोभिकरण.

२) प्र.स.एफ पेल्हार क्षेत्रातील वाकणपाडा तलावाचे सुशोभिकरण.

३) प्र.स.ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा प. येथील वॉर्ड क्र. ५६ नाळे तलावाचे सुशोभिकरण.

४) प्र.स. एफ पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील बिलालपाडा तलावाचे सुशोभिकरण.

५) प्र.स.एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील मांडवी तलावाचे सुशोभिकरण.

६) प्र.स.जी मधील गोखिवरे तलावाचे सुशोभिकरण.

७) प्र.स.ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७२ (१०३) मधील गिरीज तलावाचे सुशोभिकरण.

८) प्र.स.ई कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.७२(१०३) मधील सालोली येथील बरमाळे तलावाचे सुशोभिकरण.

९) प्र.स. ई कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.७२(१०३) मधील सालोली उतळेश्वर तलावाचे सुशोभिकरण.

१०) वॉर्ड क्र. १०३ मधील गिरीज टोकपाडा तलावाचे सुशोभिकरण करणे.

११) प्र.स.एफ पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील प्र.क्र. ५९ मधील श्री. नंदु किणी यांच्या घराजवळील तलाव क्र.१ चे सुशोभिकरण

१२) नालासोपारा पु. वॉर्ड क्र. २७ मधील मनवेल पाडा तलावाचे सुशोभिकरण.

१३) प्र.स.जी वॉर्ड नं. ८९ मध्ये कामण पिराचा तलावाचे सुशोभिकरण

१४) प्र.स.आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ पापाडी तलावाचे सुशोभिकरण

१५) विरार पु. प्र.क्र.१ मध्ये गासकोपरी तलावाचे सुशोभिकरण.

१६) प्र.स.ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा प. वॉर्ड क्र. ५६ भदाळे तलाव सुशोभिकरण.

१७) नालासोपारा प. प्र.क्र. ८४ गणेश तलावाचे सुशोभिकरण.

सन २०१९-२० मध्ये रु. १२ कोटी ४९ लक्ष व सन २०२०-२१ मधे रु. ३३ कोटी २ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

१४ बांधकाम व्यवस्था :- बांधकामाच्या महसुली खर्च विषयक बाबी, दुरुस्ती विषयक बाबी, नविन कामे इ. साठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद आहेत. इमारत दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती इतर बांधकामांची दुरुस्ती देखभाल, रस्ते सौंदर्यीकरण, कॅटआय रिफ्लेक्टर व्यवस्था, कामगार निवास दुरुस्ती, विशेष तांत्रिक कामांसाठी तांत्रिक सल्लागारामार्फत बांधकामाचे नियोजन व अंदाजपत्रक तयार करुन नियंत्रण ठेवणे, भुमापन खर्च, संरक्षक भिंत बांधकाम दुरुस्ती, हुतात्मा स्मारके व ऐतिहासिक स्मारक देखभाल, प्रशासकिय इमारत व कार्यालय आणि समिती सभागृहाचे बांधकाम व नुतनीकरण, पुढील पाच वर्षाच्या दुरुस्ती देखभालीच्या जबाबदारीसह विविध ठिकाणी सिमेंटचे रस्ते, डांबरी रस्ते, नविन रस्त्यांसाठी खडीकरण, पदपथ व्यवस्था, गटार बांधकाम, भुमिगत गटार व्यवस्था, नाला व मोरी बांधकामे, गटारावर चेंबर्स व्यवस्था सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधकामे, भुसंपादीत आरक्षित जागांचा विकास, महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक व स्वागत कमानी, अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकासकामे, यासह प्रभाग समिती स्तरावर प्रभाग समिती निधीतील आवश्यक कामे, वैशिष्टयपूर्ण कामे व मुलभूत सुविधा विषयक कामासठी प्राप्त विशेष निधीतील कामे करणे यासह मा. आमदार निधीतील कामांसह, मा. आमदार निधीतील कामे, बंदर विकास कामांतर्गत मच्छीमार / कोळी बांधवांसाठी व्यवस्था वृध्दीकरिता शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकवण्यासाठी चौथरा बांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे

कॉक्रिटीकरण, उतरता धक्का बांधणे, धुप प्रतिबंधक बंधारे व समुद्र किनारी संरक्षक भिंती उभारणे इत्यादी विविध विकासकामांसाठी

रस्ता बांधकाम:-

१) प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ११५ मधील विकास आराखड्यामधील ३० मी. रुंदीचा कामण बापाणे रस्त्याचे बांधकाम

२) विरार प. म्हाडा मैदान ते नालासोपारा पेट्रोलपंप पर्यत ३० मी. रुंदीचा डि.पी रस्ता.

३) प्रभाग समिती ए येथील विरार प. प्रभाग क्र. ३ मध्ये भवानी मंदीर ते मारंबळपाडा जेट्टी पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण.

४) प्रभाग समिती बी पेल्हार क्षेत्रातील फणसपाडा ते वैतरणा स्टेशन पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण.

५) प्रभाग समिती बी पेल्हार क्षेत्रातील अमुल डेअरी, कणेर ते वैतरणा स्टेशनपर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण.

६) विरार पुर्वेकडील रेल्वे स्टेशनपासुन आर.जे हॉटेल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण.

७) विरार पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासून बोळिज जकात नाका पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण.

८) नालासोपारा पुर्वेकडील रेल्वे स्टेशनपासुन तुळींज मुख्य रस्ता (जुना टोल नाका) पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण.

९) नालासोपारा पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासुन शुर्पाक मैदान पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण.

१०) वसई पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासुन वर्तक चौक ते पंचवटी हॉटेल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण.

११) वसई पश्चिमेकडील रेल्वे स्टेशनपासुन माणिकपुर पेट्रोलपंप पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण.

१२) प्र. स. जी वॉर्ड क्र. ११५ मध्ये कामण बापाणे डि. पी. रस्ता

१३) प्र.स. डी येथील वॉर्ड क्र. ८० मध्ये एव्हरशाईन सिटी येथे विद्याविकासीनी शाळा ते फादरवाडी येथे (१२ मी डी. पी.) चा मुख्य रस्ता

१४) प्र. स. आय वॉर्ड क्र. ११२ मधील पोलीस लाईन पाठीमागील १२ मी डी.पी. रस्ता

१५) प्रभाग समिती बी वॉर्ड क्र. ५२ तुळीज मुख्य रस्ता ते सेंट्रल पार्क रोड (१२ मी. डी.पी)पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण

शहरांतर्गत उड्डाणपूल (रॅम्प ब्रिज व इतर ब्रिज):-

१)विराटनगर येथील रेल्वे ओव्हर ब्रीजचे बांधकाम

२) ओस्वाल नगरी रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम

३) अलकापुरी येथील रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम

४) नायगांव येथील रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम

५) नालासोपारा पुर्व पश्चिम कडील जोडणारा वाढीव रेल्वे ओव्हर ब्रिजचे बांधकाम

६) विरार (पूर्व) रेल्वे फाटक क्र. ४० येथे रॅम्प ब्रीजचे बांधकाम

७)वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच मध्ये पार्वती क्रॉस ते स्टेला पेट्रोल पंप पर्यत फ्लाय ओव्हर ब्रिज बांधणे.

विकासनिधी अंतर्गत विकास आराखड्यातील आरक्षित जागेचा विकास :-

१)वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पे ॲन्ड पार्क विकसीत करणे

२)प्रभाग क्र. २० मध्ये विरार (प) जुने पोस्ट ऑफीस जवळील १२ मी. DP रस्ता विकसीत करणे.

३) प्रभाग क्र. २९ मध्ये विरार (प) प्रथमेश अपार्ट ते मुख्य रस्त्यापर्यत १२/२० मी. DP रस्ता विकसीत करणे.

४) प्रभाग क्र. ३१ मध्ये विरार (प) ग्रामीण रुग्णालय ते एस.टी.डेपो (गावठण) ९ मी DP रस्ता विकसीत करणे.

५) प्रभाग क्र. २९ मध्ये विरार (प) कै. भास्कर वामन ठाकूर मंडई ते प्लॅटफॉर्म क्र. १ पर्यत असलेल्या १२/२० मी DP रस्ता विकसीत करणे.

६) प्रभाग क्र. २० मध्ये विरार (प) शक्ती सदन बिल्डींग लगतचा DP रस्ता विकसीत करणे.

७) पापडी ब्राम्हण आळि ते स्टेटस हॉटेल २० मी DP रस्ता विकसीत करणे.

८) प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ८८ मध्ये भोयदापाडा येथे सर्वे. ५३२ येथे पार्किग लॉट व बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम

९) प्रभाग समिती डी मध्ये आचोळे सर्व्हे नं. ६ मध्ये मैदानाचा विकास.

१०) प्रभाग समिती जी वॉर्ड क्र. ७४ मधील अप्पा मैदानाचा विकास.

११) प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील आरक्षण क्र. २९९ (मौजे निळेमोरे) येथे प्ले ग्राऊंडचा विकास.

१२) प्रभाग समिती ई आरक्षण क्र. ३९१ येथे प्ले ग्राऊंडचा विकास.

सन २०१९-२० मध्ये रु. २३२ कोटी १८ लक्ष व २०२०-२१ मध्ये रु. ३३३ कोटी ४९ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

१५ नाले खोदाई / पुरप्रतिबंधक कामे :- पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊन शहरामध्ये पाणी तुंबून राहू नये यासाठी नियमीत नाले सफाईसह निरी/आय.आय.टी. या तांत्रिक तज्ञ संस्थे मार्फत पुर प्रतिबंधक उपाययोजने बाबत सर्वेक्षण करण्यांत आले. व त्यानुसार पुरप्रतिबंधक उपाययोजनेसाठी त्यांनी महत्वाची कामे सुचविले आहेत. त्यानुसार खालील कामे हाती घेण्यात आली आहे.

१) पाण्याचे नैसर्गिक निचरा होणारे मार्ग मोकळे करुन पुनःस्थापित करणे.

२) पावसाळ्यात पुराचे पाणी वाहुन जाण्यासाठी अधिक मोठे नाले विकसित करणे.

३) शहरातील रस्त्यांची उंची वाढविणे.

४) मंजुर शहर विकास आराखडयानुसार होल्डींग पॉन्डस बांधणे.

५) समुद्राच्या भरती/ओहटी च्या वेळी समुद्राचे पाणी खाडीमध्ये आत येण्याच्या ठिकाणी स्वयंचलीत झडपा (Automated Gates) बसविणे.

६) हवामान अंदाज केंद्र स्थापन करणे.

या कामांसाठी विकास विषयक कामांसाठी रु.१०० कोटी तरतुद प्रस्तावित आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोदाई करणेकामी सन २०१९-२० रु. २५ कोटी व सन २०२०-२१ मध्ये १० कोटी ७५ लक्ष इतकी स्वतंत्र तरतुद प्रस्तावित आहे.

१६ शिक्षण व्यवस्था :- अ) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा ताब्यात घेणे, पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण व्यवस्थापनासह माध्यमिक शिक्षणांतर्गत मराठी, हिंदी, गुजराथी व उर्दू माध्यमाच्या शाळांना महिला बाल कल्याण विभागाच्या योजनेच्या तरतुदीमधून सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी , क्रीडासाहित्य, प्रयोग शाळेतील साहित्य, विद्युत जनित्र/इनव्हर्टर व्यवस्था इ. साधन सामुग्री पुरविणे या बाबींसाठी आवश्यक तरतूद, शाळागृह इमारतीची दुरुस्ती, जिल्हा परिषदेच्या शाळा प्रत्यक्ष महानगरपालिकेच्या ताब्यात येई पर्यंत प्राथमिक शिक्षण निधीची तरतूद तसेच देय प्राथमिक शिक्षण अंशदानाच्या तरतुदीमधून यापूर्वी अदा केलेली प्राथमिक शिक्षण निधीची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कमेतून प्रत्यक्ष महानगरपालिकेमार्फत शालेय व्यवस्थापन इत्यादी बाबींसाठी सन २०१९-२०-२१ मध्ये रु. १ कोटी २५ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

ब) प्राथमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परिक्षा व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर पारितोषिके देणे.

मागासवर्गीय विद्यार्थी व सर्व प्रवर्गातील विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र तरतुदी मागासवर्गीय कल्याणकारी योजना व महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत अन्यत्र नमुदप्रमाणे आहेत.

१७ वाचनालय व्यवस्था :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी वाचनालय व अभ्यासिका व्यवस्था उपलब्ध करणे, पुर्वीच्या शहरी भागातील वाचनालयांचा दर्जा सुधारणे, योजनांतर्गत वित्तीय सहाय्य, महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथालयांना अनुदान देणे, वाचनालय व अभ्यासिका वर्षभर १२ तास सुरु ठेवणे, वाचनालय व अभ्यासिकेसाठी शुध्द व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, वाळवी प्रतिबंधक किटकनाशके

फवारणी करुन व पुस्तके बांधणी करुन पुस्तकांचे जतन करणे, **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मध्यवर्ती वाचनालयाचे बांधकाम (टाऊन लायब्ररी) सुरु करणे** इत्यादी बाबींसाठी सन २०१९-२० मध्ये रु. १ कोटी ५७ लक्ष व २०२०-२१ मध्ये रु. ४ कोटी ५ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

१८	**माहिती तंत्रज्ञान**	:-	ई - गव्हर्नन्स अंमलबजावणी करणेत आली असुन महानगरपालिकेची अद्यावत वेबसाईट, ऑनलाईन कर भरणा, राईट टु सर्विस या योजनेअंतर्गत दाखले ऑनलाईन पद्धतीने देणे, ई - निविदा कार्यवाही, जन्म - मृत्यू नोंदणी, टपाल नोंदणी, रुग्णालयासाठी संगणक आज्ञावली तयार करणे इ. संगणकीय सेवा देणेचे काम सुरु झाले आहे. संगणक प्रणाली/आज्ञावली विकसीत करणेत आली आहे. स्वतंत्र संगणकीय व्यवस्थापन केंद्र निर्माण केले जाणार आहे. सदर व्यवस्थेसाठी सन २०१९-२० मध्ये रु. १ कोटी ५९ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ६ कोटी १० लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.
१९	**सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम**	:-	स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, शिवजयंती, महात्मा गांधी जयंती व सावित्रीबाई फुले इतर थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती इत्यादी कार्यक्रमासह व्याख्यानमाला व वकृत्व स्पर्धा, इत्यादी साठी सन २०१९-२० मध्ये रु. २ कोटी ५५ लक्ष व २०२०-२१ मधे रु. २ कोटी ९२ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.
२०	**युवकांसाठी विशेष कार्यक्रम**	:-	स्पर्धात्मक युगातील यशस्वीततेसाठी युवक व युवतींकरिता विशेष शैक्षणिक कार्यक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व दहावीच्या विद्यार्थांसाठी वाचनमाला उपलब्ध करणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांना पारितोषीक व शिष्यवृत्ती देणे, तसेच शासनमान्य राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील परिक्षा व स्पर्धा परिक्षामध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य,

शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप व सामुदायीक विवाह सोहळ्यांतर्गत वर अथवा वराचे पालकांना अनुदान याकामी सन २०१९-२० मध्ये रु. १ कोटी २० लक्ष व २०२०-२१ मधे रु. १ कोटी ३६ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

मागासवर्गीय विध्यार्थ्यांसाठी व मुलींसाठी शिष्यवृत्ती व पारितोषिकाची तरतुद स्वतंत्र राखीव तरतूदीअंतर्गत आहे.

२१ **क्रिडा विषयक कार्यक्रम** :- (i) प्रभाग समिती निहाय शालेय कलाक्रीडा महोत्सवासाठी सन २०१९-२० मध्ये रु. २ कोटी व सन २०२०-२१ मधे रु. २ कोटी ५० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित प्रस्तावित आहे.

(ii) महापौर मॅरेथॉन स्पर्धेस मिळालेला प्रतिसाद, यशस्वीतता व प्रत्यक्ष खर्चाचा विचार करुन मागील थकीत देयकासह सन २०१९-२० मध्ये रु. १ कोटी ७९ लक्ष १८ हजार व सन २०२०-२१ मध्ये प्रतिवर्षी रु. २ कोटी ३० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

(iii) खेळ व संघ दत्तक घेणे, महिला खेळाडू, बालके, युवक व वरिष्ठ नागरीक यांच्या क्रीडा विषयक विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शासन मान्य स्पर्धांसाठी शालेय विद्यार्थ्यांचे क्रीडासंघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, यासाठी महानगरपालिकेची क्रीडासमिती नियुक्त करुन खेळाडू, प्रशिक्षक व संघ सदस्यांना लागणारे क्रीडा साहित्य गणवेश / टी शर्ट, प्रवास खर्च व इतर अनुषांगीक खर्चासाठी अर्थसहाय्य मंजुर करणे, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय क्रीडा संघटना व सर्व खेळांच्या अधिकृत राज्य संघटनांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या क्रीडा स्पर्धा व राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या शालेय क्रीडा स्पर्धा यामधील रौप्य, कांस्य व सुवर्ण पदके मिळवणाऱ्या स्पर्धकांना क्रीडासाधना, क्रीडा संजिवनी योजनेअंतर्गत रु. १० हजार ते रु. १ कोटी पर्यंतची बक्षिसे देणे व त्यांचा गौरव करणे, वर्ल्ड कप, ऑलिंम्पीक, एशियाड, राष्ट्रकुल, राष्ट्रीय व इतर तत्सम स्पर्धांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना प्रोत्साहन पर रक्कम प्राथमिक खर्चासाठी मदत स्वरुपात अदा करणे तसेच शासनमान्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा,

ऑलींम्पीक स्पर्धा यामध्ये सहभाग घेणेसाठी निवड झालेल्या खेळाडू व संघांना अर्थसहाय्य करणे इत्यादी कामी सन २०१९-२० मध्ये रु. ४७ लक्ष व सन २०२०-२१ मधे रु. १ कोटी इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

(iv) क्रीडा प्रबोधिनी व क्रीडा व्यवस्थापनासाठी सन २०१९-२० मध्ये रु. ५० हजार व २०२०-२१ मध्ये रु. २ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

१) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील मौजे बोळींज आरक्षण क्र. १६२ (प्ले ग्राऊंड) मध्ये क्रिडासंकुल व क्लब हाऊसचे बांधकाम.

२) प्र.स. जी वॉर्ड क्र. ७५मध्ये सातिवली येथे राखीव भुखंड जागेत तरण तलाव व स्पोर्टस कॉम्प्लेक्सचे बांधकाम.

३) नालासोपारा सर्वे क्र. ३२ येथे क्रिडांगणाचे विकास

क्रिडा विकास विषयक कामांसाठी भांडवली सन २०१९-२० मध्ये रु. १६ कोटी ४ लक्ष १८ हजार व सन २०२०-२१ मधे रु. ३० कोटी इतकी तरतूद आहे. क्रीडा विषयक कार्यक्रमांसाठी महसुली सन २०१९-२० मध्ये रु. १५ कोटी ५० लक्ष व २०२०-२१ मधे रु. ३५ कोटी ८४ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

२२ विविध संस्थांना विशेष :- योजनांतर्गत वित्तीय सहाय्य

विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय, निराधार व निराश्रीत मुली व महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्था व इतर संस्थाचा सामाजिक विकासातील अमुल्य सहभाग विचारात घेता अशा संस्थाना त्यांचे विशेष कार्यासाठी प्रोत्साहन देणेकामी योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणे तद्वतच विविध वर्गाच्या ग्रंथालयांना नियमीत तसेच जेष्ठ नागरीक व विद्यार्थ्यांना विनाशुल्क सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या ग्रंथालयासाठी विशेष दराने योजनांतर्गत वित्तीय सहाय्य देणेकामी सन २०१९-२० मध्ये रु. ६९ लक्ष सन २०२०-२१ मध्ये रु. १ कोटी ८० लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

२३ **दिव्यांगांसाठी कल्याणकारी योजना** :- उपलब्ध स्कायवॉक व उड्डाणपुलांजवळ दिव्यांगांसाठी सरकते जिने व उव्दाहन, विविध महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी रॅम्पची व्यवस्था व इतर दिव्यांग कल्याणकारी योजनांच्या भांडवली खर्चासह दिव्यांग कल्याणासाठी कार्य करणाऱ्या बोळींज येथील दिव्यांग पुर्नवसन केंद्रासह इतर संस्थांना अनुदान, विशेष बालकांसाठी महिला बाल कल्याण मध्ये असलेल्या तरतुदीव्यतीरीक्त दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत ३ चाकी सायकली तसेच कृतिम अवयव कॅलिपर्स व इतर आवश्यक साहित्याचे वाटप, दिव्यांग अथवा त्यांचेवरील अवलंबीताच्या विवाहासाठी सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत अतिरीक्त अर्थसहाय्य, दिव्यांगत्वाचे आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी स्थानिक ठिकाणी विशेष शिबीरांचे आयोजन.

१) जेष्ठ ६० वर्षावरील दिव्यांगाना कायमस्वरुपी प्रतिमहा रु. २०००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.

२) दिव्यांगाना स्वंयरोजगाराकरीता व्यवसायानुसार ५० हजार पर्यंत आधार योजना राबविणे.

३) १८ वर्षावरील गतीमंदी, मतीमंद व्यक्तीच्या संगोपनाकरीता प्रतिमहा रु. २०००/- वार्षिक २४ हजार त्यांच्या कुटुंबाला अर्थसहाय्य देणे.

४) ८०% ते १००%, ६०% ते ७९%, ४०% ते ५९%, दिव्यांग असलेल्या अंध, अस्थिव्यंग, बहुविकलांग, कर्णबधिर, मुकबधिर व्यक्तींना अनुक्रमे मासिक रु. २०००/-, १५००/- व १०००/- प्रमाणे अनुदान देणे.

५) दिव्यांग खेळाडूसाठी तालुकास्तरीय रु. १० हजार , जिल्हास्तरीय रु. २५ हजार, राज्यस्तरीय रु. ५० हजार व आंतरराष्ट्रीयस्तरीय रु.१ लक्ष इतके प्रोत्साहन देण्यात येते.

६) दिव्यांग व्यक्तिना व्याधीग्रस्त आजार, शस्त्रक्रिया त्याअनुषंगीक आजारानुसार खर्चाच्या २५ % अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे.

७) दिव्यांग व्यक्तिकरीता भौतिकोपचाराची साहित्य व साधने उद्यानामध्ये उपलब्ध करुन देणे.

८) दिव्यांग व्यक्तिकरीता प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना अनुदान देणे.

या विविध योजनांमधून सन २०१८/१९ मध्ये ३ कोटी ८७ लक्ष इतका लाभ देण्यांत आला आहे. व सन २०१९-२० मध्ये रु. ५ कोटी ६१ लक्ष व २०२०-२१ मधे रु. ६ कोटी ६५ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

२४ पाणी पुरवठा व्यवस्था :-

- **सद्या शहराला सुर्या-१ व ३ , उसगांव व पेल्हार या योजनेतून एकूण २३१ द.ल.ली. पाणीपुरवठा होत आहे.**
- **केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत ३१० कि.मी. जलवाहिनी अंथरणे व विविध ठिकाणी १८ जलकुंभ बांधणे ही कामे प्रगती पथावर आहेत.**
- **महानगरपालिकेत समाविष्ठ गावांच्या वाढीव विकसित भागात पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने नव्याने जलवाहिन्या खरेदी कामी पहिल्या टप्यात र. ४.५० कोटी मान्यता देण्यांत आली असून सदर जलवाहिन्या अंथरणेकामी कार्यादेश दिले आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यात रु. १९ कोटीचे पाईप खरेदी करण्यांस मान्यता प्राप्त झाली असून त्यापैकी रु. १०.५४ कोटीचे पाईप सन २०१९-२० मध्ये खरेदी कामी कार्यवाही सुरु करण्यांत आली आहे.**
- **सुर्या- १ उसगांव योजनेतील पी.एस.सी. मुख्य जलवाहिन्या ऐवजी नविन पोलादी जलवाहिन्या बदलने प्रस्तावित करण्यात आले आहे. धुकटन येथील जलशुध्दीकरण केंद्रात वाया जाणारे पाणी पुर्नःवापर यंत्रणा बसवुन सदर पाणी वापरास घेण्याचे प्रस्तावित असुन यातुन २ ते ३ द.ल.ली. पाणी जादा उपलब्ध होणार आहे.**
- **पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र येथे अद्यावत जलशुध्दीकरण यंत्रे बसविण्यास रु. ३.५० कोटी खर्चास मान्यता देण्यांत आली असून निविदा कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सदर काम पुढील वर्षात पुर्ण होणार आहे.**
- **उसगांव व सुर्या योजनेतील जुने पंप बदलणे प्रस्तावित करण्यांत आले आहेत.**
- **महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येस पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने खोलसापाडा १ व २ ही धरणे बांधकामासाठी**

अंदाजे रु. १५० कोटी खर्चास महानगरपालिकेन प्रशासकीय मान्यता दिली असून जलसंपदा विभागामार्फत कामे हाती घेण्यात येत आहेत.

- **देहरजी, सुसरी, सातिवली, राजीवली, कामण, कवडास बंधाऱ्याची उंची वाढविणे इ. प्रकल्पांच्या दृष्टीने आवश्यक तरतुद करण्यात आली असून एम.एम.आर.डी.ए च्या सुर्या ४०३ द.ल.ली. योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत त्यातून महानगरपालिकेस १८५ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे.**
- **महानगरपालिका क्षेत्रात सुमारे ४६ हजार नळ जोडण्या देण्यांत आल्या असून त्यांना टप्प्या टप्प्याने जलमापके बसविण्याची कार्यवाही हाती घेण्यात येणार आहे. पुढील वर्षात १२ हजार जोडण्यांना जलमापके बसविल्यास त्यासाठी रु. २ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.**

पाणी पुरवठयावर सन २०१९-२० मध्ये रु. १८७ कोटी ५६ लक्ष इतकी तरतुद असुन सन २०२०-२१ मध्ये रु. २३६ कोटी ७२ लक्ष इतकी तरतुद प्रस्तावित आहे.

२५ **महिला बालकल्याण कार्यक्रम** :- बालवाडी तसेच प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपकरणे, वहया पुस्तके व खेळणी खरेदी, शाळांच्या आवश्यकतेनुसार संगणक पुरविणे, विशेष बालकांसाठी साहित्य पुरविणे व विशेष बालकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी मोफत शैक्षणिक पास योजना, नागरी गरीब विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी सायकली वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, नोकरदार महिलांसाठी वसतीगृह, निराधार महिलांसाठी तात्पुरता निवारा केंद्र व जेष्ठ महिलांसाठी वृद्धाश्रम निर्मीती व त्यांचेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देणे, महिलांसाठी तिळगुळ व हळदीकुंकू कार्यक्रम, आरोग्य शिबीर व व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम, नोकरदार व व्यवयाय करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांचे संगोपन व त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने पाळणाघर निर्मिती व सेवाभावी

नोंदणीकृत महिला गटांना पाळणाघर चालविणेसाठी अनुदान देणे, कुटूंबकल्याण कार्यक्रम, कुपोषित माता व बालकांसाठी सकस आहार, बालकांच्या विकासासाठी अन्य कार्यक्रम, महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना पोषण व अल्पोपहार भत्ता, जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर रु. १६००/- इतका पोषण व आरोग्य भत्ता देणे, डायलेसिस उपचार स्वयंसेवी संस्थांमार्फत घेणाऱ्या मुली व महिलांना अनुदान देणे, मुली व मुलांना स्वयंसेवी संस्थांमार्फत दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे, मुली व महिला यांचेकरीता तांत्रीक व व्यवसायीक प्रशिक्षण आयोजीत करणे, महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी सभागृह व व्यवसायासाठी गाळे असलेली महानगरपालिका मालकीची बहुउद्देशिय इमारत प्रभाग स्तरावर मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे, एड्स ने मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या विधवा पत्नीस वैयक्तिक अर्थसहाय्य करणे, विधवा परितक्त्या महिलांच्या मुलींच्या विवाहासाठी ठोक अनुदान देणे, विधवा परितक्त्या महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. इयत्ता १ ली ते ४ थीच्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य, इतर पदव्युत्तर शिक्षणाकरीता महिलांना अर्थसहाय्य, निराधार ज्येष्ठ महिलांना दर महा ठोक अर्थसहाय्य देणे. महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकिय तपासण्यासाठी महिला व बालकांना १००% सवलत देणे. महिलेच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख अथवा अन्य सदस्य १००% अथवा ७५% अपंग असल्यास अशा कुटुंबातील महिलांना विशेष अर्थसहाय्य देणे, अशा व्यक्तींना सामुदायीक विवाह सोहळ्यातील वर - वधुसाठी निश्चित अनुदानाव्यतिरीक्त अतिरीक्त अर्थसहाय्य, विशेष बालकांच्या संगोपनासाठी पालकांना मासिक रु. १ हजार अनुदान, विधवा परितक्त्या महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, महिला व मुलींसाठीच्या आश्रमांना अनुदान, अनाथ आश्रमांना अनुदान, महिला सक्षमिकरणासाठी विविध उपक्रम राबविणे, सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वधु अथवा वधुचे पालकाला प्रत्येकी रु. १० हजार अनुदान देणे, बालचित्रपट महोत्सव, स्त्रीरोग चिकित्सा शिबीर, मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी प्रोत्साहन अनुदान, उत्कृष्ट कामाबद्दल महिलांचा गौरव,महिलांना त्यांचे कायदेशिर अधिकार व महिलांवरील अत्याचारांसबधी समुपदेशन करणे. तसेच महिला बालकल्याण समिती मार्फत आयोजीत केल्या जाणाऱ्या इतर योजना व

कार्यक्रमांसाठी आणि महीला व बालकल्याण योजनेंतर्गत भांडवली कामे यासाठी सन २०१९-२० मध्ये रु. १६ कोटी १२ लक्ष व सन २०२०-२१ रु. १७ कोटी ७१ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

२६	**मागासवर्गीय कल्याणकारी योजना व पी बजेट**	**:-**	**यामध्ये गरीब गरजूंसाठी मोफत वैद्यकिय शिबीर, समुह गटविमा योजनेखाली मेडिक्लेम सुविधा प्राप्त करुन देणे त्याचप्रमाणे अपघाती विमा रकमे इतके थेट संरक्षणाचा लाभ देणे, दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अधिक अनुदान उपलब्ध करुन घेऊन सदर वसाहत सर्व सुविधायुक्त स्वच्छ व सुंदर करणे, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजनांतर्गत विकास कामे, विशेषतः नविन शहरी विभागात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणे, कमी उत्पन्न गटातील शेतकऱ्यांसाठी, आपत्कालीन केंद्रासाठी सहाय्य करणारे दुर्बल घटकांतील मच्छीमार बांधवांसाठीच्या सोयी सुविधा तसेच इतर मागासप्रवर्गातील भागातील रस्ते, गटार, दिवाबत्ती इ. समाजमंदिर, या सार्वजनिक सुविधांसह घ्यावयाच्या योजनांसाठी राखीव तरतूदीसह करीता सन २०१९-२० मध्ये रु. २४ कोटी ९९ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. ४० कोटी ९ लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.**
२७	**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान NULM**	**:-**	दिनदयाळ अत्योंदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत महिला बचत गट , स्वयंरोजगार, प्रशिक्षण, शहरी उपजिविका केंद्र शहरी बेघर निवारा केंद्र, फेरिवाला सहाय्य तसचे शहरी बेघरांसाठी निवारा केंद्र उभारणे व त्यांना जेवणाची व्यवस्था करणे याकामी सन २०१९-२० मध्ये रु. १ कोटी ६ लक्ष व सन २०२०-२१ मध्ये रु. १ कोटी ६ लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

२८ परिवहन सेवा :- वसई विरार शहर महानगरपालिकेची परिवहन सेवा दि. ३ ऑक्टोबर २०१२ पासून B.O.O.M. (BUY OWN, OPERATE & MAINTAIN) हया पध्दतीने रॉयल्टी तत्वावर सुरु आहे. परिवहन उपक्रमासाठी यशवंत नगर येथे परिवहन भवनाचे बांधकाम चालू आहे. तसेच २०२०/२१ या वित्तीय वर्षात काही मार्गावर महानगरपालिकेची ई बस सेवा सुरु करण्याचा मानस आहे. त्या अनुषंगाने बस खरेदी व परिवहन भवन बांधकाम यासाठी मुख्य निधी कडून परिवहन उपक्रमास सन २०२०/२१ मध्ये अनुक्रमे रु. ६७ कोटी ६९ लक्ष तरतुद आहे.

आभार,

मा. मुख्यमंत्री श्री. उध्दवजी ठाकरे साो., मा. उपमुख्यमंत्री श्री. अजितजी पवार साो., मा. पालघर जिल्हा पालकमंत्री श्री. दादाजी भुसे साो., मा. खासदार श्री. राजेंद्रजी गावित साो. मा. आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर साो, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साो, मा. आमदार श्री. राजेशजी पाटील साो, यांनी महानगरपालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. तसेच विद्यमान मा. महापौर श्री. प्रविणजी शेट्टी साो. मा. विद्यमान उपमहापौर श्री. प्रकाशजी रॉड्रीग्ज साो. मा. विद्यमान स्थायी समिती सभापती. श्री. प्रशांतजी राऊत साो. यांच्या वेळोवेळीच्या सुचना व सन्मा. गटनेते, सन्मा. सर्व प्रभाग समिती सभापती, सन्मा. सदस्याकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही वेळोवेळी प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील अर्थसंकल्पामध्ये विचारात घेतलेल्या आहेत.

सन २०१९-२० च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०२०-२१ चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक "अ", महानगरपालिकेच्या "अ" अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, दिव्यांग कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, "ब" अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अंशदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक "क", वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनियोग कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी / अमृत योजना इत्यादी विशेष निधीचे अंदाजपत्रक, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ (अ) नुसार, सन २०१९-२० या कालावधीत अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा अहवाल व इतर आवश्यक सहपत्रे सोबत जोडली आहेत.

आपल्या क्षेत्रास नवी दिशा देण्याचा व तद्नुसार सुनियोजीत कामकाज करणेचा प्रयत्न करणेस सर्व मान्यवर पत्रकार, प्रसारमाध्यमे व वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने केलेल्या सहकार्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. असेच मौलीक सहकार्य व मार्गदर्शन कायम लाभेल या सदिच्छेसह सन २०१९-२० चा सुधारीत व सन २०२०-२१ चा मुळ अर्थसंकल्प सविनय सादर.

धन्यवाद ! जय हिंद !!

दिनांक :- / /२०२०

डॉ. कैलास शिंदे
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका